अंतिम मसुदा


# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,

अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.

दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९

ईमेल-: srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in


कार्यालयीन परिपत्रक क्र :- ३० /२०२०

ताबा विभाग

दिनांक- २५/११/२०२०

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण झाल्यानंतर पात्रता निश्चित झालेल्या पात्र झोपडीधारकांना कायमस्वरूपी सदनिका वाटप करणेबाबत..

या कार्यालयाच्या कार्यालयीन परिपत्रक क्र.२३५ अन्वये उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी झोपुप्रा. पुणे यांचेकडील अंतिम पात्रता यादीमध्ये पात्र झालेल्या झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत योजनेचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ताबा विभागामार्फत सोडत पध्दतीने कायमस्वरूपी सदनिका वाटप करण्यात येतात. तथापि, अंतिम पात्रता यादीमध्ये अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांना महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदींन्वये पात्रतेचे पुरावे सादर करून सक्षम विभाग/ अपिल विभाग यांचेकडे अपील करण्याची तरतुद करण्यात आली असल्याने अशा अपात्र झोपडीधारकांची पात्रता उपरोक्त सक्षम विभाग /अपिल विभाग यांचेकडील आदेशांन्वये निश्चित करण्यात येते. परंतु, योजनेचे बांधकाम पूर्ण झाले असल्याने व अंतिम पात्रता यादीतील पात्र झोपडीधारकांना सोडत पद्धतीने सदनिका वाटप करण्यात आल्यामुळे मूळ योजनेमधील पुरवणी पात्रता यादी, फेरचौकशी आदेश अथवा अपील प्रकरणे यामध्ये पात्रता निश्चित झालेल्या पात्र झोपडीधारकांना वाटप करणेकरिता सदनिका शिल्लक राहत नाहीत. तसेच उक्त योजनाक्षेत्रात वाढीव सदनिकांचे बांधकाम करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत इमारतीमध्ये सदनिका शिल्लक नसल्यामुळे योजनेमधे पात्रता निश्चित होऊनही झोपडीधारकांना कायमस्वरूपी सदनिका उपलब्ध होत नसल्याने त्यांचा पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. तसेच, या संदर्भातील महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. १६/०५/२०१५ रोजीच्या पात्रता विषयक शासन निर्णयाद्वारे "झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या सर्व पुनर्वसन इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असल्यास दि. ०१/०१/१९९५ रोजीच्या निकषानूसार अपात्र ठरलेल्या झोपडीवासीयास तेथील पुनर्वसन इमारतीत सामावून घेणे शक्य होणार नाही," असे सुचित करण्यात आले असल्याने संबंधित झोपडीधारक पुनर्वसनापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण होते.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, या संदर्भात नव्याने धोरण ठरवून कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक असल्याने उक्त शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. पुणे यांच्या दि.११/११/२०२० रोजीच्या मान्य टीपणी अन्वये पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुरवणी पात्रता यादी, फेरचौकशी आदेश अथवा अपील प्रकरणे यामध्ये पात्रता निश्चित झालेल्या पात्र झोपडीधारकांना योजना पूर्ण झाल्यानंतर त्या योजनेमध्ये सदनिका शिल्लक नसल्याने झोपुप्राच्या ताब्यातील इतरत्र कायमस्वरूपी सदनिका वाटप करतेवेळी खालील कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे,-

१) संबंधित झोपडीधारकाची पात्रता निश्चिती सक्षम विभागामार्फत करण्यात येईल. पुरवणी पात्रता यादी, फेरचौकशी आदेश अथवा अपील प्रकरणे अशा प्रकरणी दि. ०१/०१/२००० या अर्हता दिनांकास अनुसरून पात्रता निश्चित करतेवेळी सक्षम प्राधिकारी प्रस्तुत योजनेमध्ये बांधकाम पूर्ण झाले असल्याने पुनर्वसन सदनिका शिल्लक नसल्यास झोपुप्राच्या ताब्यातील संक्रमण वसाहतीसह इतरत्र कायमस्वरूपी सदनिका संबंधित झोपडीधारकास वाटप करण्यात येईल व त्यास संबंधित झोपडीधारकाची संमती राहील, अशा आशयाचे शपथपत्र संबंधित झोपडीधारकाकडून प्राप्त करून घेतील.

२) सक्षम प्राधिकारी तांत्रिक विभागाकडून मूळ योजनेमध्ये सदनिका उपलब्ध आहेत किंवा कसे अथवा अतिरिक्त बांधकाम करणे शक्य आहे किंवा कसे याबाबतचे स्वतंत्र अभिप्राय प्राप्त करून घेतील.

३) सक्षम प्राधिकारी अशा प्रकरणातील झोपडीधारकांची स्वतंत्र पात्रता यादी तयार करतील व तांत्रिक विभागाकडील उपरोक्त अभिप्रायासह ती यादी ताबा विभागास वर्ग करतील.

४) अशा प्रकरणी पात्र ठरलेल्या झोपडीधारकास इतरत्र सदनिका देणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबतची खात्री ताबा विभागामार्फत करण्यात येईल.

५) ताबा विभागामार्फत अशा प्रकरणातील झोपडीधारकांना झोपुप्राच्या ताब्यातील इतरत्र कायमस्वरूपी सदनिका वाटप करणेस हरकत नसलेबाबत विकसकाकडून पत्र प्राप्त करून घेण्यात येईल.

६) सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त यादीतील झोपडीधारकांना इतरत्र कायमस्वरूपी सदनिका सोडत पद्धतीने वाटप करणेकामी पुढील कार्यवाही ताबा विभागामार्फत करण्यात येईल.

तथापि, अशा प्रकरणी करण्यात येणारी कार्यवाही खालील अटी व शर्तींवर करण्यात येईल :-

१) अशा प्रकरणी संबंधित झोपडीधारकास कोणत्या योजनेतील कोणती सदनिका वाटप करण्यात यावी याबाबतचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राहील व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय संबंधित झोपडीधारकावर बंधनकारक राहील.

२) विशिष्ट मजला अथवा विशिष्ट सदनिकेची निवड करण्याचा तसेच प्राप्त झालेल्या सदनिकांमध्ये कोणताही फेरबदल करण्याचा अधिकार झोपडीधारकांस राहणार नाही.

३) उपरोक्त अधिनियमातील कलम ३ई च्या तरतुदींन्वये झापेडीधारकांना कायमस्वरूपी सदनिका प्राप्त झालेनंतर करारनाम्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षांच्या कालावधीत ती व्यक्ती वाटप झालेल्या सदनिकेची विक्री, देणगी, अदलाबदल, भाडेपट्टा याद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाही. उक्त १० वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने सविहित पद्धतीनुसार अशा सदनिकेचे हस्तांतरण करता येईल. तथापि, उक्त १० वर्षांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी संबंधित झोपडीधारकाने वाटप करण्यात आलेल्या सदनिकेबाबत उपरोक्त कोणताही व्यवहार केल्याचे आढळून आल्यास अशा झोपडीधारकाची पात्रता रद्द करून संबंधित सदनिका झोपुप्राच्या ताब्यात घेण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राहतील.

४) या परिपत्रकाद्वारे करण्यात येणारी कार्यवाही ही केवळ पुरवणी पात्रता यादी, फेरचौकशी आदेश अथवा अपील प्रकरणे अशा प्रकरणी दि. ०१/०१/२००० या अर्हता दिनांकास अनुसरून पात्रता निश्चित करण्यात येणाऱ्या झोपडीधारकांपूर्ती मर्यादित असून सन २०११ नुसार सशुल्क पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांना यातील तरतुदी लागू होणार नाहीत.

25/11/20

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

प्रत:- सर्व विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.